# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://www.sus.ac.in ई-मेल: est.section@sus.ac.in




आस्थापना विभाग

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालये यांचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य, व्यवस्थापन परिषद सदस्य तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांचे संचालक, प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यास आनंद होतो की, प्रती वर्षाप्रमाणे यावर्षीही विद्यापीठ वर्धापनदिनाचे औचित्य साधून दि. ०१ ऑगस्ट, २०२६ रोजी विद्यापीठाच्या वतीने विविध पुरस्कार देण्यात येणार असून त्यामधील खालील पुरस्कारांकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य पुरस्कार
२. उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार
३. उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
४. उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार
५. उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ)
६. उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय)
७. उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ)
८. उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ)
९. उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ)
१०. उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय)
११. उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय)

उपरोक्त पुरस्कारासाठीची नियमावली व विहित अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या http://www.sus.ac.in या संकेतस्थळावर **Quick Links च्या Awards and Honors** या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात आला आहे. तरी इच्छुक व पात्र व्यवस्थापन परिषद सदस्य, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांनी आपले अर्ज विहित नमुन्यात व विहित मार्गाने तीन प्रतींमध्ये **मंगळवार, दि. ३०/०६/२०२६** पर्यंत प्र. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर - पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ केगाव, सोलापूर - ४१३ २५५ या पत्त्यावर हस्तदेय/ पोस्टाद्वारे/ कुरीअरद्वारे सादर करावेत/ पाठवावेत. **तसेच अर्ज करताना उपरोक्त नमूद पुरस्कारापैकी कोणत्या पुरस्काराकरिता अर्ज सादर करण्यात येत आहे याचा स्पष्ट उल्लेख अर्ज व लिफाफ्यावर अर्जदारानी करावा.**

सदरील अर्ज सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील. विहित मुदतीनंतर प्राप्त प्रस्तावांचा आणि विहित नमुन्यात व विहित मार्गाने पाठविण्यात न आलेल्या प्रस्तावांचा उपरोक्त पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. अतुल लकडे)**
प्र. कुलसचिव

**जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/वर्धापन दिन/२०२६/**4908
**दिनांक : 26 MAY 2026**

प्रत :

१. कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
२. प्र-कुलगुरु कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
३. कुलसचिव कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
४. व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तुत विद्यापीठ
५. अध्यक्ष / संस्थाचालक / संस्थासचिव / प्राचार्य, विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व प्रशासकीय विभागप्रमुख/मा. संचालक यांनी सदरचे परिपत्रक आपल्या महाविद्यालयात/विभागात/संकुलात सूचना फलकावर लावून सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.